# मंत्रिमंडळ निर्णय

## ४ ऑगस्ट २०१०

१. बेशिस्त वाहनचालकांना वचक बसविण्यासाठी शिक्षेच्या तरतूदीत वाढ
२. जुन्या मोटार वाहनांना पर्यावरण कर लागू करण्याचा निर्णय
३. पनवेल, वसई, बोरीवली येथे नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालये
४. पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना
५. राज्य कामगार विमा योजनेचे कामकाज कामगार विमा महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यास मान्यता.
६. भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणीसाठी अधिनियमात सुधारणा
७. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या महाविद्यालये व तंत्रनिकेतनातील पदांना सहावा वेतन आयोग

------------

# बेशिस्त वाहनचालकांना वचक बसविण्यासाठी शिक्षेच्या तरतूदीत वाढ

बेजबाबदार व बेदरकारपणे गाडी चालवून नागरिकांचे जीव घेणाऱ्या वाहनचालकांवर वचक बसावा म्हणून वाढीव दंडाची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम १७७, १७९, १८०, १८१, १८२, १८२अ, १८३, १८४, १८५, १८६, १८७, १८९, १९०, १९१, १९२, १९२अ, १९६ व १९८ या कलमांमध्ये सुधारणा करून दंडाच्या रकमेत तीनपट वाढ करण्यास व शिक्षेची तरतूद आहे तशीच कायम ठेवून त्याप्रमाणे शिफारस केंद्र शासनास करण्यास मत्रीमंडळाने मंजूरी दिली. कलम २०० अंतर्गत तडजोड शुल्काच्या रकमेत तीन पटीपर्यंत वाढ करण्यासही मंजूरी देण्यात आली आहे.

सन १००७, २००८ व २००९ या तीन वर्षात महाराष्ट्रात अनुक्रमे ७६६०१, ७५५२७ व ७१५९५ इतके रस्ते अपधात झाले आहेत. या अपघातात अनुक्रमे ११८०४, १२३९७, ११३९६ इतके लोक मृत्युमुखी पडले आहेत. मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील शिक्षेच्या तरतुदीमध्ये कायदा अस्तित्वात आल्यापासून बदल झालेला नाही. रस्त्यावरील अपघातांचे व गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेता विविध स्तरांतून व यंत्रणाकडून शिक्षेच्या तरतुदींमध्ये वाढ करण्याच्या सुचना प्राप्त झाल्या आहेत.

---o---

४ ऑगस्ट २०१०

# जुन्या मोटार वाहनांना पर्यावरण कर लागू करण्याचा निर्णय

आठ वर्षे पूर्ण झालेल्या परिवहन वाहनांसाठी आणि १५ वर्षे पूर्ण झालेल्या जुन्या खाजगी वाहनांसाठी नवीन पर्यावरण कर लागू करण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

पर्यावरण कराद्वारे प्राप्त होणाऱ्या महसुलाचा विनियोग, प्रदूषण नियंत्रण, स्वच्छ इंधन, सार्वजनिक व्यवस्था सक्षम करणे, वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्र चाचणीसाठी आधुनिक यंत्रणा उभारणे इत्यादी कामांसाठी करण्यात येणार आहे.

वाहन संवर्गानुसार पर्यावरण कराचे दर खालीलप्रमाणे लागू करण्याचा व त्यानुसार मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रीमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

१) प्रथम नोंदणी दिनांकापासून १५ वर्षे पूर्ण केलेले परिवहनेत्तर संवर्गातील वाहनांचे पुढील ५ वर्षांसाठी पर्यावरण कराचा दर दुचाकी वाहनांसाठी २ हजार रुपये, दुचाकी व्यतिरिक्त पेट्रोल वाहनांसाठी ३ हजार रुपये आणि दुचाकी व्यतिरिक्त डिझेल वाहनांसाठी ३ हजार ५०० रुपये राहील.

२) प्रथम नोंदणी दिनांकापासून ८ वर्षे पूर्ण केलेल्या परिवहन संवर्गातील वाहनांसाठी प्रत्येक ५ वर्षांसाठी एक रकमी (सीएनजी इंधनावर असल्यास १५ वर्षानंतर) पर्यावरण कराचा दर ऑटोरिक्षासाठी ७५० रुपये, सहापर्यंत आसन क्षमता असणारी मीटर टॅक्सीसाठी १२५० रुपये आणि टुरिस्ट टॅक्सी, हलके मालवाहू वाहन यासाठी २५०० रुपये राहील.

३) प्रथम नोंदणी दिनांकापासून ८ वर्षे पूर्ण केलेले परिवहन संवर्गातील वाहनांसाठी पुढील प्रत्येक वर्षासाठी पर्यावरण कराचा दर ७५०० किलोपेक्षा जास्त भार क्षमता असणारी मध्यम जड व आर्टिक्युलेटेड मालवाहू वाहनांसाठी वार्षिक कराच्या १० टक्के, कंत्राटी परवान्यांवर चालणाऱ्या बसेससाठी वार्षिक कराच्या २.५ टक्के, खाजगी सेवा (प्रायव्हेट सर्व्हिस व्हेईकल परमीट) वाहनांसाठी वार्षिक कराच्या २.५ टक्के आणि टुरिस्ट बसेससाठी वार्षिक कराच्या २.५ टक्के राहील.

सध्या १५ वर्षावरील जुनी परिवहनेतर वाहने १५ लाखाच्या वर आहेत व ८ वर्षावरील परिवहन वाहने ६ लाखाच्यावर आहेत. अशा वाहनाकडून उपरोक्त कर आकारण्यात येणार आहे. उपरोक्त कर लावल्याने वाहन मालक ही वाहने मोडीत काढतील व पर्यायाने रस्त्यावरून ती कमी होती. त्यामुळे रस्त्यावरील प्रदूषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल व जी वाहने वाहन मालक रस्त्यावर वापरतील त्यांच्याकडून पर्यावरण कर प्राप्त होईल.

--००--

# पनवेल, वसई, बोरीवली येथे नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालये

पनवेल येथे नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालय तसेच वसई, बोरीवली येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालये निर्माण करण्याचा निर्णय आज घेण्यात आला.

मोटार वाहन विभाग हा राज्य शासनाला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळवून देणारा विभाग आहे. सन २०१०-११ या वर्षासाठी ३ हजार कोटी रुपये इतक्या महसुलाचे उद्दिष्ट ठेवले आहे. राज्यात प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय मिळून एकूण ४५ कार्यालये आहेत. उद्दिष्ट साध्य होण्यासाठी व प्रशासकीय नियंत्रण अधिक परिणामकारक व्हावे यासाठी आणि मुंबई, नवी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील वाढती लोकसंख्या व वाहनसंख्या विचारात घेऊन प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) व प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचे विभाजन करून आणखी ३ नवीन कार्यालये निर्माण करणे आवश्यक झाले आहे. जवळच्या कार्यालयांचा व आटोपशीर छोटा विभाग झाल्यास परिणामकारक नियंत्रण ठेवणे शक्य होईल. तसेच नियोजित महसूल उद्दिष्टात वाढ करणे शक्य होईल.

सध्याच्या प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) यामध्ये वांद्रे ते दहिसर हा परिसर आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यामध्ये ठाणे जिल्हा, ठाणे जिल्ह्याचा पश्चिम भाग, ठाणे शहर व भिवंडी हा भाग येतो. या दोन्ही परिवहन कार्यालयांचे भौगोलिक क्षेत्र खूप मोठे असल्याने त्याचे विभाजन करून प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) यांच्या अधिपत्याखाली उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली हे नवीन कार्यालय निर्माण करण्यात येईल. यामध्ये गोरेगांव ते दहिसर हा परिसर येईल.

सध्याच्या प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे याचे विभाजन करून प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई अशी २ नवीन कार्यालये निर्माण करण्यात येतील. प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल यामध्ये पनवेल, कर्जत, खालापूर, कामोठे, खारघर, कळंबोली हा परिसर येईल आणि उप प्रादेशिक परिवहन कार्यालये, पेण जिल्हा रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग त्यांच्या अधिपत्याखाली येतील. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई हे प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांच्या अधिपत्याखाली राहील. तसेच त्यामध्ये मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्र, पालघर, डहाणू व तलासरी हे तालुके येतील.

---००---

# पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राज्यातील गावांचा शाश्वत विकास (Sustainable Village Development) घडवून आणण्याकरीता पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

भैातिक (Physical), सामाजिक (Social) व उत्पन्न साधने (Livelyhood) या तीन क्षेत्रात शासनाच्या आर्थिक तांत्रिक व प्रशासकिय सहकार्याने, लोकांच्या पुढाकाराने हा विकास अपेक्षित आहे. यापैकी दर्जेदार भौतिक मुलभूत सुविधा साठीचा हा कार्यक्रम आहे. शाश्वत ग्रामविकास संकल्पनेत महत्त्वाचे तत्त्व असे आहे की, गावात एकीकडे उच्च प्रतिच्या भौतिक सुविधांची निर्मिती करतानाच यासाठी लागणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा विनियोग पर्यावरणाचा समतोल राखून कसा करता येईल याचाही प्राथम्याने विचार झाला पाहिजे.

दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असून नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होत आहे, त्यामुळे "Global Warming" सारखे अनेक विषय मुळ धरु पाहत आहेत. पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करुन समृध्द व संपन्न गांवाची निर्मिती करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणीय संतुलन राखून गावाचा शाश्वत विकास हा या योजनेचा मूळ उद्देश आहे

या योजनेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत :-

(१) पर्यावरण समतोल राखण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक संसाधनाचा विकास करणे व त्यासाठी लोकसहभाग मिळविणे.

(२) पर्यावरणाचे भान ठेऊन भौतिक सुविधा उपलब्ध करणे व इको व्हिलेजची संकल्पना राबवून समृध्द ग्राम निर्माण करणे.

(३) यासाठी राज्य शासनाच्या विविध विभागाच्या ग्रामस्तरीय विविध योजनांची सांगड घालून योजनांचा समन्वय करणे व जेथे ही संकल्पना राबविण्यासाठी नव्या योजनांची, कार्यक्रमांची गरज आहे, ती पोकळी भरण्यासाठी तसे कार्यक्रम/योजना ग्रामविकास विभागामार्फत कार्यान्वित करणे.

(४) मोठया ग्रामपंचायतींना विकास केंद्र म्हणून विकसीत करणे.

शासनाकडुन प्राप्त झालेल्या या योजनेचा निधी ग्रामपंचायतींना रोपवाटिका व वृक्षसंवर्धन, गावातील घनकच-याचे व्यवस्थापन (मुख्यतः संकलन व प्रक्रिया, विविध जैवीक व पर्यावरण संतुलीत तंत्रज्ञानाचा वापर करून), गावातील सांडपाण्याचे व्यवस्थापन, जलनिःसारण गटारे ( Stormwater Drainage ), रस्त्यावरील दिवाबत्ती- सौर पथदिवे, अपारंपारीक उर्जा विकास व वापर (पवन, सौर,जैवीक, इ.), दहन-दफन भूमी बांधकाम व त्यासाठी आवश्यक इतर सोईसुविधा पुरविणे, स्मृती

उद्यान, ग्रामपंचायती अंतर्गत गावे व वाडयांना जोडणारे साकव बांधकाम, उद्याने व बसथांबा, राजीव गांधी भारत निर्माण ग्राम सुविधा केंद्र (६०:४० प्रमाणात राखतांना लागणारा अतिरीक्त निधी), पर्यावरण संतुलीत विकासाकरीता इतर नाविन्यपूर्ण प्रकल्प इत्यादी मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याकरीता देण्यात येईल.

१०००० चे वरील लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींची आजमितीस संख्या ३८९ आहे, या ग्रामपंचायतींना पर्यावरण संतुलित गांव योजनेतून विकास केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी त्यांचा ग्रामविकास आराखडा व पर्यावरण विकास आराखडा तयार करणे व त्यासाठी अधिक निधी व तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

या योजनेत गावांना निधी प्राप्त होण्याचे निकष पुढील प्रमाणे:-

| अ. क्र. | निकष | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | अ) वृक्ष लागवड<br>ब) वृक्ष संवर्धन | ५०% लोकसंख्या इतके वृक्ष लागवड | १) लोकसंख्येच्या प्रमाणात झाडे लावली नसल्यास त्यापैकी किमान ५०% नवीन लागवड<br>२) गतवर्षी लावलेल्या वृक्षांच्या जगल्याच्या प्रमाणात अनुदान परंतु **२५% जास्त जगल्यासच अनुदानास पात्र** | लोकसंख्येच्या इतकी झाडे लावली नसल्यास ती लावणे व गेल्या २ वर्षात लावलेल्या वृक्षांच्या जगल्याच्या प्रमाणात अनुदान **५०% जास्त जगल्यास अनुदानास पात्र** |
| २ | हगणदारीमुक्त | ६०% | ७५ % | १०० % |
| ३ | कर वसूली (घरपट्टी, पाणीपट्टी) | ६०% | ८० % | ९० % |
| ४ | प्लास्टीक बंदी | पूर्ण | पूर्ण | पूर्ण |
| ५ | संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान | सहभाग घेणे | ५०% गुण | ६०% गुण |
| ६ | यशवंत पंचायत राज अभियान | सहभाग घेणे | ५०% गुण | ६० % गुण |
| ७ | अपारंपारिक उर्जा | | ५०% स्ट्रिट लाईट (सौर, CFL, LED)<br>१०% कुटुबांकडे बायोगॅस | १००% स्ट्रिट लाईट (सौर, CFL, LED)<br>२५% कुटुबांकडे बायोगॅस<br>१०% घरात सौरउर्जावापर (CFL, LED) |
| ८ | घनकचरा व्यवस्थापन | | १००% संपूर्ण सकलन<br>५०% कचऱ्यापासून खत निर्मिती | १००% संपूर्ण सकलन<br>१००% कचऱ्यापासून खत निर्मिती |
| ९ | सांडपाणी व्यवस्थापन | | ५०% शास्त्रशुध्द व्यवस्थापन | ७५% शास्त्रशुध्द व्यवस्थापन |

या योजनेची गावपातळीवर अमंलबजावणी ग्रामपंचायती मार्फत होणार आहे. निकष पूर्ण केल्यानंतर तपासणीनंतर ग्रामपंचायतीस या योजनेतंर्गत निधी देण्यात येईल.

योजनेच्या अंमलबजावणीकरीता तपासणी व सनियत्रंणासाठी पंचायत समितीस्तरावर सभापतींच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा परिषदस्तरावर अध्यक्ष जिल्हा परिषद यांच्याअध्यक्षतेखाली, तसेच राज्यस्तरावर मा. मंत्री ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सेवाभावी संस्था अथवा तज्ञांचे तंत्रिक सहकार्य मदत घेण्यात येईल.

दरवर्षी किमान रु. ३३२ कोटी इतका खर्च या योजनेसाठी अपेक्षित आहे.

---०---

# राज्य कामगार विमा योजनेचे कामकाज
# कामगार विमा महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यास मान्यता

महाराष्ट्र राज्यातील राज्य कामगार विमा योजनेचे कामकाज राज्य कामगार विमा महामंडळाकडे हस्तांतरीत करणे तसेच महासंचालक, राज्य कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांनी या योजनेच्या हस्तांतरणाबाबत सादर केलेल्या सामंजस्य करारास काही सुधारणांसह मान्यता देण्यात आली.

या निर्णयामुळे महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या तीन रुग्णालयांची स्थावर व जंगम मालमत्ता व या तीन रुग्णालयांसह एकूण १४ रुग्णालयांचे व्यवस्थापन व त्यामधील ५७०२ अधिकारी व कर्मचारी राज्य कामगार विमा महामंडळाकडे प्रचलित धोरणाप्रमाणे हस्तांतरीत होतील. राज्य कामगार विमा महामंडळाकडून या सर्व रुग्णालयांच्या सुधारणा व आधुनिकीकरणावर सुमारे १५०० कोटी एवढी गुंतवणूक अपेक्षित आहे. राज्य कामगार विमा महामंडळाकडून राज्य कामगार विमा योजनेच्या काही रुग्णालयात वैद्यकिय शिक्षणाची व्यवस्था करण्यात येत असून त्यामुळे दरवर्षी सुमारे ५०० वैद्यकिय / समवैद्यकिय मनुष्यबळ राज्यास उपलब्ध होणार आहे. या निर्णयामुळे विमाधारकांना अधिक गुणात्मक वैद्यकिय सुविधा उपलब्ध होणार आहेत.

---------

# भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता
# कर आकारणीसाठी अधिनियमात सुधारणा

भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणीसाठी महानगरपालिका व नगरपालिका अधिनियमात सुधारणा करण्यासाठी अध्यादेश प्रख्यापित करण्यास मान्यता देण्यात आली.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १ एप्रिल २०१० पासून भांडवली मूल्यावर आधारीत मालमत्ता कर आकारणीची पध्दत अंमलात आणण्यासाठी काही कायदेशीर व इतर अडचणी दूर करण्याकरीता व मालमत्ता कर आकारणीची प्रक्रीया अधिक सुलभ करण्याकरीता तसेच या कर प्रणालीसंदर्भात राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदा अधिनियमातील तरतूदीमध्ये अधिक स्पष्टता आणण्याकरीता महानगरपालिका व नगरपालिका अधिनियमात सुधारणा करण्यासंदर्भात अध्यादेश प्रख्यापित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

---------

# तंत्रशिक्षण संचालनालयाच्या महाविद्यालये व तंत्रनिकेतनातील पदांना सहावा वेतन आयोग

_अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत व्यवसायीक अभ्यासक्रमातील पदवी व पदविका अभ्यासक्रम राबविणा-या शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालये व तंत्र निकेतनातील शिक्षकीय पदांना तथा ग्रंथपालांना सहाव्या वेतन आयोगाच्या सुधारीत वेतनसंरचना लागू करण्यास मान्यता देण्यात आली.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या दिनांक ५ मार्च २०१० रोजीच्या अधिसूचनेनुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत व्यवसायिक अभ्यासक्रम (अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, वास्तुशास्त्र, व्यवस्थापन शास्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी इ.) राबविणा-या शासकीय व अशासकीय अनुदानित महाविद्यालये तथा तंत्रनिकेतनातील विविध शिक्षकीय पदे व ग्रंथपालांना ६ व्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना लागू करण्यात येणार आहे.

शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांतील शिक्षक व ग्रंथपालांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने जाहीर केलेल्या सुधारित वेतन संरचना व त्या अनुषंगाने देय ठरणार महागाई भत्ता दिनांक १ जानेवारी, २००६ पासून लागू होईल .

उपरोक्त प्रमाणे सुधारीत वेतन संरचना लागू झाल्यामुळे दिनांक ३१ मार्च, २०१० अखेर पर्यंत व्यवसायीक अभ्यासक्रम राबविणा-या शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थांतील शिक्षक व ग्रंथपालांना अनुक्रमे रु. ८२ कोटी व रु. १०८.२२ कोटी अशी एकूण रु. १९०.२२ कोटी एवढी फरकाची रक्कम देय ठरेल. यापैकी पदवी संस्थातील शिक्षकाना देय ठरणारी ८० टक्के फरकाची रक्कम म्हणजे रु. ६५.६० कोटींची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून होणार आहे. उर्वरित रु. १२४.६२ कोटीचा अनावर्ती भार तथा दिनांक १ एप्रिल, २०१० पासून पुढे रु. ४४.५३ कोटी प्रति वर्ष एवढा आवर्ती भार राज्य शासनावर पडणार आहे.

---------